# निलेश ज्ञानदेव लंके
**लोकसभा सदस्य**
३७ अहमदनगर (अहिल्यानगर) दक्षिण
महाराष्ट्र

सत्यमेव जयते

**दिल्ली पत्ता :**
नविन महाराष्ट्र सदन, के.जी.मार्ग,
नवी दिल्ली–११०००१
**अ.नगर (अहिल्यानगर) पत्ता :**
शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालया शेजारी
बुरुडगांव रोड, भवानी नगर, अहमदनगर
(महाराष्ट्र) पिन –४१४००१


Ref: 3533/2025-26
Date: 01/09/2025

प्रति,
**मा. जिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
अहिल्यानगर.

**विषय- जिल्हा नियोजन बैठक (DPC)सन २०२५-२६ वर्षा अंतर्गत खालील कामांना मंजुरी मिळणे बाबत....**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये, माझ्या लोकसभा मतदार संघातील खालील कामे हि महावितरण विभागा अंतर्गत(MSEB) येत असून त्यांना आर्थिक वर्ष सन २०२५-२६ जिल्हा नियोजन बैठक ( DPC) अंतर्गत मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा.

| अ.क्र | कामाचे नाव |
|---|---|
| १ | मौजे.अळकुटी(शिरोळे वस्ती) ता.पारनेर येथे विद्युत रोहित्र बसविणे. |
| २ | मौजे.मावळेवाडी, ता. पारनेर येथे विद्युत रोहित्र बसविणे. |
| ३ | मौजे.बाभूळवाडा,(खणकर मळा) ता. पारनेर येथे ६३ के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे |
| ४ | मौजे.रायतळे,(गट नं-६९७) साबळे वस्ती,ता. पारनेर येथे ६३ के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे. |
| ५ | मौजे.पिंपळगाव लांडगा,(पुंडे/कुमटकर वस्ती) ता. नगर येथे ६३ के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे. |
| ६ | मौजे.तरडगाव ता.श्रीगोंदा येथील गट नं- ३४ बलभिम गुंजाळ वस्ती येथे ६३ के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे |
| ७ | मौजे.खडकी ता.नगर येथील गट नं- १८६ मध्ये ६३ के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे |
| ८ | मौजे.गारकौठा ता.श्रीगोंदा हनुमंतवाडी येथे ६३ के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे |
| ९ | मौजे.मोहटे ता.पाथर्डी येथील खाडे वस्ती गट नं-२१५ येथे १०० के.व्ही.विद्युत रोहित्र बसविणे |
| १० | मौजे.ढोकी, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| ११ | मौजे.हिवरे कोरडा, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| १२ | मौजे.तिखोल, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| १३ | मौजे.ढवळपुरी, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| १४ | मौजे.श्रीगोंदा(लक्ष्मीनगर), ता.श्रीगोंदा येथे सिंगल फेज करणे. |
| १५ | मौजे.पिंपळगाव वाघा, ता.नगर येथे विद्युत रोहित्र बसविणे |


**संपर्क कार्यालय व पत्र व्यवहाराचा पत्ता :** न्यु आर्टस् कॉलेज शेजारी, पारनेर, ता.पारनेर, जि.अ.नगर (अहिल्यानगर) पिन–४१४३०२
फोन : (०२४८८)२९५३३३ मोबाईल : ९४९९१००२६८ / ९४९९२००२६८ Email Id : mpnileshlanke3333@gmail.com

# निलेश ज्ञानदेव लंके

**लोकसभा सदस्य**

३७ अहमदनगर (अहिल्यानगर) दक्षिण

महाराष्ट्र

सत्यमेव जयते

**दिल्ली पत्ता :**
नविन महाराष्ट्र सदन, के.जी.मार्ग,
नवी दिल्ली-११०००१
**अ.नगर (अहिल्यानगर) पत्ता :**
शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालया शेजारी
बुरुडगांव रोड, भवानी नगर, अहमदनगर
(महाराष्ट्र) पिन -४१४००१


| | |
|---|---|
| १६ | मौजे.अकोळनेर, ता.नगर येथे सिंगल फेज करणे. |
| १७ | मौजे.वारणवाडी, ता.पारनेर येथे विद्युत रोहित्र बसविणे |
| १८ | मौजे.ढोकी(डोईफोडे वस्ती), ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| १९ | मौजे.वनकुटे(पुनर्वसन वस्ती), ता.पारनेर येथे विद्युत रोहित्र बसविणे |
| २० | मौजे.देविभोयरे, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| २१ | मौजे.कळमकरवाडी(हिवरमाळ वस्ती), ता.पारनेर येथे विद्युत रोहित्र बसविणे |
| २२ | मौजे.देसवडे, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| २३ | मौजे.रायतळे, ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |
| २४ | मौजे.धोत्रे(मंचर दरा), ता.पारनेर येथे सिंगल फेज करणे. |

खासदार निलेश ज्ञानदेव लंके
लोकसभा सदस्य ३७, अ.नगर (दक्षिण) महाराष्ट्र
सत्यमेव जयते

आपला स्नेहांकित,

(निलेश ज्ञानदेव लंके)

**प्रत माहितीसाठी-**

मा. कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या. कार्यालय अहिल्यानगर.


**संपर्क कार्यालय व पत्र व्यवहाराचा पत्ता :** न्यु आर्टस् कॉलेज शेजारी, पारनेर, ता.पारनेर, जि.अ.नगर (अहिल्यानगर) पिन-४१४३०२
फोन : (०२४८८)२९५३३३ मोबाईल : ९४९९१००२६८ / ९४९९२००२६८ Email Id : mpnileshlanke3333@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

# जिल्हा नियोजन समिती,
# जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर

इ-मेल : dpo.ah-mh@gov.in दूरध्वनी क्रमांक : 0241-2345864

जावक क्र. जिनिस/ O/2025/Oct/AAO/05114 दिनांक-31/10/2025

**प्रशासकीय मान्यता आदेश**

**विषय : सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजना - सन 2025-2026 योजने अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे.**

**संदर्भः- 1. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, अहमदनगर यांचेकडील पत्र क्र.4980 01/09/2025,**
**2. मा.खा.श्री. निलेश लंके, लो.स.स. अहमदनगर (अहिल्यानगर) यांचे पत्र जा.क्र.Ref.3533/2025-26, दि.01/09/2025.**
**3. अधीक्षक अभियंता (संवसु) मराविविकंम, मंडल, अहमदनगर यांनी iPAS प्रणालीद्वारे सादर केलेले प्रस्ताव/अंदाजपत्रके.**

महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.जिवायो-1007/प्र.क्र.39/का.1444,दि.16.02.2008 अन्वये सुधारीत कार्यप्रणालीनुसार जिल्हाधिकारी यांना सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजने संदर्भात प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचे अधिकार दिले आहेत. या प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव जिल्हा नियोजन समिती, अहिल्यानगर सन 2025-2026 या आर्थिक वर्षाकरीता लेखाशिर्ष- **सामान्य विकास व पध्दती सुधारणांसाठी महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनी मर्यादितला अनुदान, 28015919** 31सहायक अनुदाने (वेतनेतर), या योजनेतून, **अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, अहमदनगर** यांनी संदर्भिय पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावातील खालील योजनेतील समाविष्ट कामे/बाबींना पुढे नमुद केलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

संदर्भ क्र. 2 अन्वये मा.खा.श्री. निलेश लंके, लो.स.स. अहमदनगर (अहिल्यानगर) यांनी शिफारस केलेल्या कामांना कार्यान्वयीन यंत्रणेने आय पास प्रणालीद्वारे सादर केलेल्या अंदाजपत्रकास अधिन राहुन खालील नमुद कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**कार्यान्वयीन यंत्रणा - अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, अहमदनगर** **(रक्कम हजारात)**

| अ. क्र. | कामाचा संकेतांक | तालुका | गाव/शहर | कामाचे नाव | तांत्रिक मान्यता | | प्रशासकीय मान्यता रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | दिनांक | रक्कम | |
| 1 | GP/2526/3717 | पारनेर | आळकुटी | मौजे अळकुटी, ता. पारनेर येथील शिरोळे वस्ती येथे विद्युत रोहित्र बसविणे. | 28/10/2025 | 1061.400 | 1061.400 |
| 2 | GP/2526/3718 | नगर | खडकी | मौजे खडकी, ता.जि.अ.नगर येथील गट नं. १८६ मध्ये ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे विद्युत रोहित्र बसविणे. | 29/10/2025 | 815.700 | 815.700 |
| 3 | GP/2526/3719 | पारनेर | तिखोल | मौजे तिखोल, ता. पारनेर येथील वैभव बाळासाहेब टिक्कल वस्ती सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 25/03/2025 | 642.844 | 642.844 |
| 4 | GP/2526/3720 | पारनेर | धोत्रे बु. | मौजे धोत्रे, ता. पारनेर येथील मंचर दरा येथे सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 29/10/2025 | 623.626 | 623.626 |
| 5 | GP/2526/3721 | नगर | पिंपळगांव लांडगा | मौजे पिंपळगाव लांडगा, ता.जि.अ.नगर येथील पुंडे/कुमटकर वस्ती येथे ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे विद्युत रोहित्र बसविणे. | 29/10/2025 | 1182.700 | 1182.700 |
| 6 | GP/2526/3722 | पारनेर | मावळेवाडी | मौजे मावळेवाडी, ता. पारनेर येथे विद्युत रोहित्र बसविणे. | 28/10/2025 | 957.700 | 957.700 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | GP/2526/3723 | पारनेर | रायते | मौजे रायतळे, ता. पारनेर येथील साबळे वस्ती गट नं. ६७९ मध्ये ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे विद्युत रोहित्र बसविणे. | 28/10/2025 | 621.500 | 621.500 |
| 8 | GP/2526/3724 | पारनेर | वरवंडी | मौजे वारणवाडी, ता. पारनेर येथील गावठाण येथे विद्युत रोहित्र बसविणे. | 25/03/2025 | 292.700 | 292.700 |
| 9 | GP/2526/3725 | श्रीगोंदे | श्रीगोंदा | मौजे श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा येथील लक्ष्मीनगर सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 28/10/2025 | 872.178 | 872.178 |
| 10 | GP/2526/3726 | पारनेर | हिवरे कोरडा | मौजे हिवरे कोरडा, ता. पारनेर येथील सांडस वस्ती सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 25/03/2025 | 564.610 | 564.610 |
| 11 | GP/2526/3727 | पारनेर | कळमकरवाडी | मौजे कळमकरवाडी, ता. पारनेर येथील हिवरमाळ वस्ती येथे विद्युत रोहित्र बसविणे. | 04/03/2025 | 2467.500 | 2467.500 |
| 12 | GP/2526/3728 | पारनेर | ढोकी | मौजे ढोकी, ता. पारनेर येथील डोईफोडे वस्ती येथे सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 19/03/2025 | 527.501 | 527.501 |
| 13 | GP/2526/3729 | पारनेर | देवी भोयरे | मौजे देविभोयरे, ता. पारनेर येथील करकडे मळा येथे सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 25/03/2025 | 421.867 | 421.867 |
| 14 | GP/2526/3730 | पारनेर | देसवडे | मौजे देसवडे, ता. पारनेर, जि.अ.नगर येथील जावळदरा येथे सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 29/10/2025 | 1085.627 | 1085.627 |
| 15 | GP/2526/3731 | पारनेर | रायते | मौजे रायतळे, ता. पारनेर, जि.अ.नगर येथील संजय साबळे घराजवळ सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 29/10/2025 | 355.809 | 355.809 |
| 16 | GP/2526/3732 | नगर | अकोलनेर | मौजे अकोळनेर, ता.जि.अ.नगर येथील अविनाश जाधव यांचे घराजवळ सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 29/10/2025 | 1161.300 | 1161.300 |
| 17 | GP/2526/3733 | पारनेर | ढवळपुरी | मौजे ढवळपुरी, ता. पारनेर येथील कोकणे वाडा, खारवाडी सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 25/03/2025 | 387.472 | 387.472 |
| 18 | GP/2526/3734 | पारनेर | ढोकी | मौजे ढोकी, ता. पारनेर येथील डोईफोडे वस्ती सिंगल फेज लाईटची व्यवस्था करणे. | 25/03/2025 | 384.147 | 384.147 |
| 19 | GP/2526/3735 | श्रीगोंदे | तरडगव्हाण | मौजे तरडगाव, ता. श्रीगोंदा जि.अ.नगर येथील गट नं. ३४ बलभिम गुंजाळ वस्ती येथे ६३ के.व्ही.ए. क्षमतेचे विद्युत रोहित्र बसविणे. | 24/06/2025 | 872.965 | 872.965 |
| | | | | | एकूण | 15299.146 | 15299.146 |

**या आदेशान्वये एकूण प्रशासकीय मान्यता रक्कम -अक्षरी रुपये एक कोटी बावन्न लक्ष नव्व्याण्णव हजार एक शे सेहेचाळीस फक्त**

वरील कामांना प्रशासकीय मान्यता ही शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेश/ मार्गदर्शक सुचना, निकष, खर्चाचे मापदंड, आणि पुढे नमुद केलेल्या अटी व शर्तीचे पालन करणे कार्यान्वियीन यंत्रणेस बंधनकारक आहे.

**अटी व शर्ती**

1 .अंदाजपत्रकानुसार कामाची जागा जी निश्चित असेल, त्याच जागेवर काम घेण्यात यावे त्यात कुठलाही बदल करू नये. संबंधित स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सदर कामांबाबत देखभाल दुरुस्तीचे हमीपत्र आणि बांधकामास ना-हरकत दाखला प्राप्त झाल्याशिवाय कोणत्याही कामास सुरवात करण्यात येऊ नये.

2 .आदेशातील कामांचे लहान भाग करुन कार्यान्वीत करु नये.

3 .आदेशातील कामांचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास तपशिलवार तांत्रिक मान्यता प्राप्त करुन घेतल्यानंतरच, कामे सुरु करावीत. याबाबतची सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

4 .आदेशातील कामांचे व अनुषंगिक अभिलेखे यांचे निरिक्षण व तपासणिचे काम , संबंधीत स्वत: कार्यकारी अभियंता यांचेकडून आणि जिल्हाधिकारी यांनी नियुक्त केलेल्या अधिका-यांकडून अथवा नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन अथवा संबंधीत खात्याने नेमून दिलेल्या अधिका-याकडून होऊ शकेल.

5 .आदेशातील कामांना जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजना अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत असून जिल्हा वार्षिक योजनेतून घेण्यात येणारे काम विहीत कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

6 .आदेशातील कामे यापूर्वी झालेली नाहीत, अन्य योजनेतून मंजूर/कार्यान्वीत केलेली नाहीत व त्यासाठी निधी प्राप्त झालेला नाही याची खात्री करण्यात यावी.

7 .आदेशातील कामे सदर योजणेतंर्गत अनुज्ञेय असल्याबाबत खात्री करण्यात यावी. योजनेतंर्गत अनुज्ञेय नसलेल्या कामांवर निधी खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

8 .उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उद्योग-4, दि. 1 डिसेंबर, 2016 अन्वये विहित कार्यपद्धतीनुसार खरेदी करण्यात यावी. त्यानुसार एकूण खरेदीमूल्य मर्यादेनुसार विहित खरेदीपद्धतीचा अवलंब करून कार्यालयस्तरावर गठित खरेदी समितीद्वारे खरेदी करावी. दरपत्रकांद्वारे खरेदी करताना सदर नियमपुस्तिकेच्या नियम 3.2.3 चे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसेच खरेदी अधिकारी यांनी वित्त विभागाकडून संबंधित आर्थिक वर्षात घालून दिलेल्या कालमर्यादेत खरेदीप्रक्रिया पूर्ण होईल, याची खबरदारी घ्यावी.

9 .काम चालू असताना अंमलबजावणी अधिकारी यांनी स्वतः कामावर भेटी देऊन काम अंदाजपत्रकानुसार आणि ठरलेल्या कालावधीत चालू आहे याची वेळोवेळी खात्री करावी.

10 .काम पुर्ण झाल्यानंतर कामांची नोंद संबंधीत शासन/ स्थानिक स्वराज्य संस्थेने शासनाने विहीत केलेल्या नमुन्यात मालमत्ता नोंदवहीत स्वंतत्र घेण्यात यावी.

11 .काम पुर्ण झाल्यानंतर कामाचा पुर्णत्वाचा दाखला व कामावर केलेल्या खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र या कार्यालयास आठ दिवसाच्या आत सादर करावेत.

12 .काम पूर्ण झाल्यानंतर ते त्वरीत जनतेच्या सार्वजनिक वापरात येतील याची दक्षता संबंधीत कार्यान्वियीन यंत्रणांनी घ्यावी.

13 .काम सुरु करण्यापूर्वी प्रस्तावित जागेचा फोटा काढण्यात यावा, तसेच काम सुरु असतानांचे व काम पूर्ण झाल्याचे देखील फोटो काढण्यात यावे.

14 .कामांची निविदा निश्चित करण्यापुर्वी कामाची जागा ही शासकीय अथवा स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या मालकीची असल्याची खात्री करुनच कामास सुरवात करावी. (अपवाद यात्रास्थळ येथील ट्रस्ट्च्या जागेवरील कामे- मात्र या ठिकाणी विहीत केलेला करारपत्र कार्यान्वियीन यंत्रणेने लिहून घेणे बंधनकारक आहे.)

15 .कामाची गुणवत्ता राखणे व मंजुर अंदाजपत्रकानुसार/ आराखड्यानुसार काम करुन घेण्याची जबाबदारी ही कार्यान्वियीन यंत्रणेची राहील.

16 .कामे पूर्ण झाल्यानंतर त्याची देखभाल-दुरुस्ती करण्यात येईल याबाबतचे प्रमाणपत्र सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतल्यानंतरच कामास सुरुवात करण्यात यावी व कामे पूर्ण झाल्यावर पुढील देखभाल व दुरुस्तीकरिता संबंधित प्राधिकारी यांचेकडे सोपविण्यात यावीत.

17 .कामे सुरू होण्या पुर्वीचे, काम प्रगतीत असतांना आणि काम पुर्ण झाल्यानंतरचे कामांचे छायाचित्र अंतिम देयकाची मागणी करतांना या कार्यालयास सादर करावे.

18 .क्षेत्रिय अधिका-यांनी आदेशातील कामांचे बांधकामास सुरुवात करण्यापूर्वी हे काम देखभाल व दुरुस्ती स्वरुपाचे नाही याची खात्री करावी, तसेच हे काम कोणत्याही पाटबंधारे/जलविद्युत/पाणीपुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली येण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामूळे या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची खात्री करुन घ्यावी. थोडक्यात नजिकच्या काळात कोणत्याही प्रकल्पाने बाधित होणार नाही तसेच आतापर्यंत या कार्यक्रमातंर्गत मंजूर केलेल्या कामापेक्षा हे काम नविन आहे असे गृहीत धरुन कामास मंजूरी दिली आहे.

19 .क्षेत्रीय अधिका-यांनी या कामाच्या प्रत्येक बांधकामास सुरूवात करण्यापुर्वी काम कोणत्याही पाटबंधारे/जलविद्युत/ पाणीपुरवठा प्रकल्पांच्या जलाशयाखाली येण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पामुळे या वरील कामावर कोणताही परीणाम होणार नाही याची खात्री करून घेतली पाहीजे.

20 .निधीच्या उपलब्धतेस अधिन राहून प्रशासकिय मान्यता देण्यात येत असून निधी उपलब्ध झाल्यावरच कामे कार्यान्वीत करावीत. सदरच्या कामांवर प्राप्त निधी त्या त्या संबंधीत कामांवरच कामनिहाय खर्च करावा, अन्य कामांवर खर्च करु नये.

21 .प्रशासकीय मंजूर रक्कमेपेक्षा झालेला खर्च कमी असेल तर शिल्लक/बचत रक्कम 30 दिवसाच्या आत या कार्यालयास परत करावी.

22 .प्रशासकीय मंजूरी दिलेली कामे ही खाजगी मालकीच्या जागेवर असणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रस्तावित कामासाठी लागणा-या कामाच्या जागा मालकिचा दाखला सक्षम प्राधिकारी यांचेकडून प्राप्त करुन घेतल्याशिवाय कामास सुरुवात करण्यात येऊ नये. प्रस्तावित कामाच्या जागेत कोणताही बदल करु नये. जिल्हाधिकारी यांनी प्रशासकीय मान्यता दिली याचा अर्थ जागेचे ना-हरकत-प्रमाणपत्र दिले असे समजण्यात येऊ नये. भविष्यात जागेबाबत वाद उदभवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी ही कार्यान्वियीन यंत्रणेची राहील.

23 .प्रशासकीय मंजूरी दिलेल्या कामांचा तांत्रिक दर्जा राखण्याची संपूर्ण जबाबदारी ही कार्यान्वियी यंत्रणेची राहील. मंजूर केलेली कामे विनाविलंब सुरु करावीत. काही अडचणी असल्यास त्वरीत माझे निदर्शनास आणाव्यात.

24 .प्रशासकीय मान्यता /निविदा रक्कम या दोहोंपैकी जी रक्कम कमी आहे त्यापेक्षा जास्त खर्च होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. कामावर बचत झालेली रक्क्म विहीत मार्गाने शासन सदरी जमा करणेत यावी.

25 .भूकंप प्रवण क्षेत्र असल्यास भूकंप रोधक बांधकामे करण्याची दक्षता घेण्यात यावी.

26 .मंजूर करण्यात येत असलेल्या कामांकरिता निविदा/कार्यारंभ आदेश देणेविषयक प्रक्रिया करण्यापूर्वी सदर क्षेत्र आदर्श आचारसंहिता क्षेत्रात नसलेबाबत खातरजमा करावी. आदर्श आचारसंहिता भंग झाल्यास सर्वस्वी जबाबदारी कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

27 .मंजूर कामांची माहिती दर्शविणारा फलक कामाच्या दर्शनी भागावर लावणे अनिवार्य आहे.

28 .या कामाचे निरीक्षण व तपासणीचे काम शासन, कार्यान्वयीन यंत्रणेच्या विभागातील अधिकारी आणि जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिका-

याकडुन अथवा यांनी नेमून दिलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत केली जाऊ शकेल.

29 .या योजनेचा आढावा/निरीक्षण अथवा तपासणीचे काम शासन, कार्यान्वयीन यंत्रणेच्या विभागातील अधिकारी आणि जिल्हाधिकारी अथवा त्यांनी नियुक्त केलेल्या अधिका-याकडुन अथवा यांनी नेमून दिलेल्या त्रयस्थ संस्थेमार्फत केली जाऊ शकेल.

30 .योजने अंतर्गत कामाची गुणवत्ता राखणे व मंजुर अंदाजपत्रकानुसार/ आराखड्यानुसार काम करुन घेण्याची जबाबदारी ही कार्यान्वयीन यंत्रणेची राहील.

31 .योजनेची अंमलबजावणी चालू असताना अंमलबजावणी अधिकारी यांनी स्वतः भेटी देऊन सदरची योजना अंदाजपत्रकानुसार आणि ठरलेल्या कालावधीत चालू आहे याची वेळोवेळी खात्री करावी.

32 .योजनेची अंमलबजावणी पुर्ण झाल्यानंतर केलेल्या खर्चाचे उपयोगीता प्रमाणपत्र या कार्यालयास आठ दिवसाच्या आत सादर करावेत.

33 .योजनेची अंमलबजावणी सुरू असतांनाची आणि योजना पुर्ण झाल्यानंतरची छायाचित्र अंतिम देयकाची मागणी करतांना या कार्यालयास सादर करावे.

34 .वरील कामांना सुरवात करण्यापुर्वी वन विभाग, पर्यावरण विभाग व शासनाचे इतर विविध विभाग यांच्या कोणत्याही अटी/ नियम /कायदा यांचे उल्लंघन होणार नाही याबाबत कार्यन्वयीन यंत्रणेने खात्री करुन घेतली पाहिजे.

35 .वरील कामे पुर्ण झाल्यानंतर परीरक्षणासाठी संबंधीत शासन/ स्थानिक स्वराज्य संस्थेकडे ताब्यात देऊन ताबा पावती या कार्यालयास सादर करावी.

36 .वेळोवेळी निर्गमीत झालेली शासनाची मार्गदर्शक तत्वे व खर्चाचे मापदंड यांचे काटेकोर पालन करावे.

37 .शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार काम पुर्ण करण्याची मुदत काम मंजुर झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एका वर्षाची आहे. कार्यान्वयीन यंत्रणेस कोणत्याही परिस्थितीत कामास मुदतवाढ देता येणार नाही. कामे विहीत वेळेत पुर्ण न झाल्यास संबंधीत अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

38 .शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार योजनेतील कामे पुर्ण करण्याची मुदत योजना मंजुर झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एका वर्षाची आहे. कार्यान्वयीन यंत्रणेस कोणत्याही परिस्थितीत या योजनेस मुदतवाढ देता येणार नाही. योजनेतीक्ल कामे विहीत वेळेत पुर्ण न झाल्यास संबंधीत अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल.

39 .शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या कार्यपद्धतीनुसार स्वतंत्र खरेदीप्रक्रिया राबवून निम्नतम रकमेच्या पुरवठादारास / ठेकेदारास, पुरवठा / कार्यारंभ आदेश देऊन कार्यवाही करावी

40 .सदर काम हे कोणत्याही मोठ्या कामाचा भाग नसल्याची खात्री करण्यात यावी. तसेच कोणत्याही मोठ्या कामाचे लहान भाग म्हणून कामे प्रस्तावित केलेले नाही याची कार्यान्वयीन यंत्रणांनी खात्री करुनच कामास सुरवात करावी.

41 .सदर कामांची उपयुक्तता ही सार्वजनिक स्वरुपाची असावी. कामांचा वापर/ उपयोग हा खाजगी/ वैयक्तिक/ खाजगी कार्यालयीन स्वरुपाचे वापरासाठी नसावा. तसेच प्रस्तावित कामामुळे सार्वजनिक लोकोपयोगी कायमस्वरुपी मालमत्ता निर्माण झाली पाहिजे.

42 .सदर कार्यक्रमांतर्गत दिलेली रक्कम ही प्रशासकीय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील बाबींवरच खर्च करण्यात यावी. प्रशासकीय मान्यता प्राप्त रकमेशिवाय वाढीव निधी अनुज्ञेय नाही.

43 .सदर कार्यक्रमातंर्गत दिलेली रक्कम अंदाजपत्रकात दिलेल्या बाबीवरच प्रशासकीय मान्यतेनुसार दर्शविलेल्या मर्यादितच करावी.

44 .सदर योजनेतील कामांचा या सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजने व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कार्यक्रमात अथवा योजनेत समावेश झालेला नाही याची खात्री करूनच काम सुरू करावे.

45 .सदर योजनेतील निवड झालेला लाभार्थ्यांचा याच योजनेतील लाभ सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजने व्यतिरिक्त अन्य कोणत्याही कार्यक्रमात अथवा योजनेत समावेश झालेला नाही याची खात्री करूनच लाभ प्रदान करावा.

46 .ही कामे तांत्रिकदृष्टया शासनाचे/खात्याचे अद्यावत असलेल्या योजना कार्यान्वीत करावयाच्या नियमांना धरुन असली पाहिजेत.

47 .उपरोक्त प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत असलेल्या कामास/कामांना ऑनलाईन युनिक आय डी क्रमांक घेणे संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणेस बंधनकारक राहील, त्याशिवाय उपरोक्त नमुद कामास/कामांना निधी वितरीत केला जाणार नाही.

**(डॉ. पंकज आशिया, भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी अहिल्यानगर**

**प्रति -**

कार्यान्वयीन यंत्रणा - अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत, अहमदनगर